RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष १२, अंक ९ (४)] शुक्रवार, मार्च १३, २०२६/फाल्गुन २२, शके १९४७ [पृष्ठे ९, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक १९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **१३ मार्च, २०२६** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम, ११६ अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. XIV OF 2026.**

A BILL

TO ESTABLISH A COMMISSION FOR THE ENCOURAGEMENT, PROMOTION, MANAGEMENT, REGULATION, TRAINING AND CONVERSION OF YOGA AND NATUROPATHY INTO A PROFESSION IN THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४.**

**महाराष्ट्र राज्यात योग तथा प्राकृतिक चिकीत्सेला प्रोत्साहन, प्रचार, व्यवस्थापन, विनियमन व प्रशिक्षणासाठी तसेच त्याचे व्यवसायात रूपांतर करण्यासाठी आयोगाची स्थापना करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** योग आणि प्राकृतिक चिकित्सेच्या प्रचारासाठी आणि नियमनासाठी 'महाराष्ट्र योग आणि प्राकृतिक चिकित्सा परिषद' (Council) स्थापन करणे इष्ट आहे; निसर्गोपचाराला केवळ उपचार पद्धती न ठेवता, त्याला एक मान्यताप्राप्त व्यवसाय म्हणून विकसित करणे इष्ट आहे; या क्षेत्रात काम करणाऱ्या डॉक्टरांची आणि तज्ज्ञांची अधिकृत नोंदणी करणे इष्ट आहे; योग आणि निसर्गोपचार क्षेत्रातील अभ्यासक्रम आणि प्रशिक्षणाचे नियमन करणे इष्ट आहे; योगासने आणि प्राकृतिक चिकित्सेला क्रीडा आणि शारीरिक शिक्षणाच्या स्वरूपात प्रोत्साहन देणे इष्ट आहे;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहेः-

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास महाराष्ट्र योग आयोग अधिनियम, २०२६ असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे निश्चीत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमामध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर -

(क) "आयोग" याचा अर्थ कलम ३ अनुसार स्थापन होणारा महाराष्ट्र योग आयोग.

(ब) "आयुष" म्हणजे, आयुर्वेद, योग आणि नैसर्गिक औषध, युनानी, सिद्ध, सोआ-रिग्पा तथा होमिओपॅथी शी संबंधित आयुर्विज्ञानाची स्वदेशी पध्दती.

(ग) "अध्यक्ष" याचा अर्थ आयोगाचा अध्यक्ष.

(घ) "समिती" याचा अर्थ अधिनियमाच्या कलम १६ अनुसार गठित समिती.

(ड) "संस्था" याचा अर्थ राज्य सरकार किंवा केंद्र सरकारद्वारा मान्यताप्राप्त योग या प्राकृतीक-चिकीत्सा अभ्यासक्रमांचे संचालन करणाऱ्या कायद्याद्वारे स्थापित कोणतेही महाविद्यालय/ संस्था/विद्यापीठ/ बोर्ड/ विद्याशाखा.

(च) "सदस्य" याचा अर्थ, अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांच्यासह आयोगाचे शासकीय किंवा अशासकीय सदस्य.

(छ) "प्राकृतिक" चिकीत्सा याचा अर्थ, आरोग्य प्रवर्तक, रोगनिवारण, उपचारात्मक आणि पुर्नसंचयित करणारे संभाव्य असे जीवनातील शारिरीक, मानसिक, नैतिक आणि अध्यात्मिक स्तरावरील प्रकृतीच्या रचनात्मक सिध्दातांच्या समन्वयातून मानवी शरीराच्या रचनेची पध्दत.

(ज) "प्राकृतिक चिकीत्सा पध्दती" थेरेपी याचा अर्थ, ज्यात जीवन शक्ती सिध्दांत, विषरक्तता, शरीराची स्व-उपचार क्षमता आणि निरोगी जीवन व्यतीत करण्याच्या सिध्दांतावर आधारित उपचारात प्राकृतीक तत्वांचा उपयोग करणारी थेरेपी, औषधी रहित, गैर आक्रमणशाली पध्दत.

(झ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाअंतर्गत तयार करण्यात आलेल्या निवर्माच्या माध्यमातून विहित.

(क) "रजिस्टर" याचा अर्थ कलम १८ चे पोट-कलम (२) चा खंड (क) अनुसार अनुरक्षित व्यवसाय करणाऱ्यांचे रजिस्टर.

(ट) "नोंदणीकृत योग किंवा प्राकृतिक चिकीत्सा व्यवसायी", याचा अर्थ हा अधिनियम आणि यानुसार तयार करण्यात आलेले नियम याच्या अधीन राहून नोंदणीकृत असलेले येग किंवा प्राकृतीक चिकीत्सा व्यवसायी.

(ठ) "रजिस्ट्रार" याचा अर्थ आयोगाचा रजिस्ट्रार.

(ड) "राज्य सरकार" याचा अर्थ, प्रशासकीय विभागात महाराष्ट्र राज्याचे सरकार.

(ढ) "योग" याचा अर्थ संतुलित पद्धत, जी संपूर्ण आत्मबोध प्राप्त करण्याचे साधन आहे, यात कोणाच्याही अन्तर्निहित शक्तीमध्ये सुधारणा किंवा विकास करण्याच्या दृष्टीने शिक्षण आणि मन परिवर्तनाचे शमन करण्यासाठी एक सक्षम तंत्र आहे.

३. (१) **महाराष्ट्र शासन राजपत्र** अधिसूचनेद्वारा या अधिनियमातील तरतुदींच्या अधीन राहून महाराष्ट्र योग आयोग या नावाने परिचीत प्रदत्त शक्तींचा प्रयोग करणे आणि कृत्यांचे पालन करण्यासाठी संस्थेची स्थापना करेल. आयोगाची स्थापना.

४. **महाराष्ट्र शासन राजपत्र** अधिसूचनेद्वारा खालील सदस्यांनी मिळून तयार होणाऱ्या आयोगाची रचना खालीलप्रमाणे असेल :- आयोगाची रचना.

**(१) शासकीय सदस्यः—**

(क) आयुक्त, क्रिडा तथा युवक कल्याण विभाग, महाराष्ट्र हे किंवा त्यांचा प्रतिनिधी, जे उपायुक्त/उप संचालक या पदाच्या खालील नसावा.

(ख) आयुक्त, वैद्यकिय शिक्षण तथा आयुष संचालनालय, मुंबई (महाराष्ट्र) हे किंवा त्यांचे प्रतिनिधी जे संचालक/सहा. संचालक या पदाच्या खालील नसावा.

(ग) डीन / रजिष्ट्रार महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक हे किंवा त्यांचा प्रतिनिधी जो विभागाध्यक्ष योग या पदाच्या खालील नसावा.

(घ) संचालक, शिक्षण संचालनालय, पुणे (महाराष्ट्र) हे किंवा त्यांचा प्रतिनिधी जो उप संचालक / सहा. संचालक या पदांच्या खालील नसावा.

(ङ) चिकीत्सा अधिकारी आयुष विभाग.

**(२) अशासकीय सदस्यः—**

राज्य सरकार द्वारे खालीलपैकी नामनिर्दिष्ट करण्यात येणारे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांच्यासह ११ अशासकीय सदस्य राहतील.

(क) योग शिक्षा / प्रशिक्षण / व्यवसाय यात कमीत कमी पाच वर्षांचा अनुभव असलेले आयुष मधील पदवीधारक तीन सदस्य.

(ख) प्राकृतिक चिकीत्सा क्षेत्रात कमीत कमी पाच वर्ष अनुभवासह प्राकृतिक चिकीत्सा तथा योग विज्ञान पदवीधारक दोन सदस्य.

(ग) संशोधन क्षेत्रासह योग / प्राकृतिक चिकीत्सा क्षेत्रातील पदवीधारक एक सदस्य.

(घ) योग शिक्षा/प्रशिक्षण/व्यवसाय यात कमीत कमी पाच वर्ष अनुभवासह प्रमाणपत्रधारक कोणत्याही विद्याशाखेतील पदवीधारक तीन सदस्य.

(ङ) नोंदणीकृत योग या प्राकृतिक चिकीत्सा व्यावसायिकांमधील दोन सदस्य.

५. आयोगाचा अध्यक्ष, अशासकीय सदस्यांमध्ये राज्य सरकार द्वारा नामनिर्देशित करण्यात येईल आणि अशा शक्तींचा प्रयोग तसेच अशा कृत्यांचे पालन करेल जे विहित करण्यात आले आहे. आयोगाचा अध्यक्ष.

६. आयोगाचा उपाध्यक्ष अशासकीय सदस्यांमधून राज्य सरकारद्वारा नामनिर्देशित करण्यात येईल. तसेच अध्यक्षाच्या अनुपस्थितीत किंवा पद रिक्त झाल्यास अध्यक्षाच्या कर्तव्याचे पालन करेल. आयोगाचा उपाध्यक्ष.

७. (१) राज्य सरकार, आयुष विभाग, महाराष्ट्र यांच्या चिकित्सा अधिकाऱ्याला आयोगाच्या रजिस्ट्रार या पदावर प्रतिनियुक्त करेल जो आयोगाचा सदस्य-सचिव राहील. तसेच अशा कर्तव्याचे पालन करेल जे विहित करण्यात आले आहेत. आयोगाचा सचिव.

(२) रजिस्ट्रार बैठकीत पारित करण्यात आलेल्या सर्व निर्णय तथा संकल्प यांना अभिप्रमाणित करेल आणि बैठकीची कार्यवाहीच्या प्रक्रियेचे अनुसरण करेल, जे विहित करण्यात आले आहे.

अशासकीय सदस्य, आणि अन्य कर्मचाऱ्यांचे नियमन व शर्ती.

८. अशासकीय सदस्य आणि अन्य कर्मचाऱ्यांच्या सेवांचे नियमन तसेच शर्ती खालीलप्रमाणे असतील :—

(१) अशासकीय सदस्य ५ वर्षाच्या कालावधीसाठी नामनिर्देशित करण्यात येतील. जे राज्य सरकारच्या अनुमतीने आणखी कालावधीसाठी विस्तारयोग्य होऊ शकतील.

(२) अशासकीय सदस्यांचा कालावधी आयोगाच्या प्रथम बैठकीपासून प्रारंभ होईल.

(३) अशासकीय सदस्य, कोणत्याही क्षणी आपल्या स्वाक्षरीसहीत अध्यक्षांना संबोधित आणि शर्ती करत आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतील आणि त्यामुळे रिक्त होणारे पद नामांकनाच्या माध्यमातून भरले जाऊ शकते.

(४) अशासकीय सदस्यांना, आयोगाच्या बैठकीत उपस्थित राहण्यासाठी मानधन, भत्ते, जे निर्धारित करण्यात आले आहे ते देण्यात येतील.

(५) आयोगाचे अशासकीय सदस्य, अधिकारी आणि अन्य कर्मचाऱ्यांना योग्य वेतन, भत्ते, मानधन आदींचे प्रदान राज्य सरकारद्वारे प्राप्त होणाऱ्या अनुदानातून करण्यात येईल.

(६) आयोगाचे अशासकीय सदस्य, अधिकारी तसेच अन्य कर्मचारी यांना योग्य वेतन, भत्ते आणि सेवेचे अन्य नियमन तसेच शर्ती विहित केल्याप्रमाणे अंमलात येतील.

अशासकीय सदस्यांची अयोग्यता.

९. (१) कोणताही अशासकीय सदस्य पदावर राहण्यास अयोग्य होईल जर तो सदस्य -

(क) ज्याला दिवाळखोर घोषित करण्यात आलेले आहे

(ख) नैतिक अधःपतन होणाऱ्या गुन्ह्यात ज्याला दोषसिद्ध ठरविण्यात आले आहे तसेच कारावासासाठी दंडीत करण्यात आले आहे.

(ग) जो मनोविकृत झाला असून सक्षम चिकीत्सा बोर्डाद्वारे घोषित करण्यात आले आहे अशी व्यक्ती.

(घ) कोणत्याही चिकीत्सेमुळे किंवा परिणामी आपल्या कर्तव्याचे पालन करण्यासाठी असमर्थ झाल्यामुळे.

(ङ) अनुपस्थितीसंदर्भात आयोगाकडून रजा न मिळविता स्वतः सलग तीन बैठकींना अनुपस्थित राहील्यास.

(च) आपल्या पदाचा दुरूपयोग करत पदावर कायम राहत लोकहिताशी प्रताडना केल्यास परंतु कोणत्याही सदस्याला या खण्डातील तरतुदीनुसार तोपर्यंत हटविले जाणार नाही जो पर्यंत त्या सदस्याला सुनावणी, युक्तीवादाची संधी देण्यात येणार नाही.

अशासकीय सदस्यांना पदावरुन हटविण्यात येणे.

१०. राज्य सरकार कोणत्याही क्षणी, कोणत्याही किंवा सर्वच अशासकीय सदस्यांना पदावरून हटवू शकते, जर या अधिनियमातील मुळ उद्देशांच्या विरोधात जाऊन ते पदावरून काम करत असतील, तर त्यांना पदमुक्त केले जाऊ शकते.

रिक्ततेबाबत.

११. अशासकीय सदस्यांचा मृत्यु झाल्यास, राजीनामा, अयोग्यता किंवा हटविल्या जाण्यामुळे रिक्त होणाऱ्या सदस्यांच्या पदावर नव्याने नामांकन करत शक्य तितक्या लवकर ते पद भरले जाईल, त्या पदाचा कालावधी पुर्वाधिकाऱ्याच्या असमास अवधीसाठी राहील.

रिक्ततेमुळे कार्यवाही अवैध न होणे.

१२. आयोगाची कोणतीही कार्यवाही किंवा कारवाई केवळ कोणाच्या रिक्ततेमुळे होणाऱ्या आयोगाच्या गठनात एखाद्या त्रुटीच्या आधारावर प्रश्नगत होणार नाही किंवा अवैध होणार नाही.

अधिकारी तसेच अन्य कर्मचारी.

१३. राज्य सरकार आयोगाच्या मागणीनुसार आयोगाच्या निर्वेधपणे कार्य संचालनासाठी योग्य असे अधिकारी तसेच अन्य कर्मचारी आयोगाला उपलब्ध करेल.

**१४.** आयोग प्रत्येक तीन महिन्यात कमीत कमी एक वेळा आणि अत्यावश्यक बैठकी आयोजित करेल तसेच बैठकीची गणपूर्ती सदस्यांच्या एकूण संख्येच्या एक तृतीयांश असेल. आयोगाची बैठक.

**१५.** राज्य सरकार आयोगाला युक्तियुक्त नोटिस दिल्यानंतर तसेच याबाबतचे आक्षेप, समजा असल्यास, ते ऐकल्यानंतर, आयोगाद्वारे पारित एखादा संकल्प निलंबित, रद्द किंवा त्यात सुधारणा करू शकेल. संकल्पांचे निलंबन, रद्द होणे तसेच त्या सुधारणा करणे.

**१६.** (१) आयोगाच्या निर्वेधपणे कार्य संचालनासाठी, आयोग १:२ या अनुपातात शासकीय सदस्य आणि अशासकीय सदस्यांमधून किमान तीन सदस्यांची मिळून तयार होतील इतक्या समित्या ज्या योग्य असतील अशा समित्यांचे गठन करू शकेल. समित्या.

(२) या पध्दतीने गठित होणारी समिती, विहित कालावधीत, आपला अहवाल/प्रस्ताव /सूचना/ शिफारशी प्रस्तुत करेल आणि आयोगाला सादर करेल.

**१७.** आयोग खालील कार्ये करेल अर्थात - आयेगाची कार्ये.

(क) राज्य सरकारच्या सुचनेनुसार योग किंवा प्राकृतिक-चिकीत्सा यांचा प्रचार करणे, प्रशिक्षण तथा विनियमन यासाठी कार्य करणे.

(ख) प्राथमिक, माध्यमिक तथा उच्च माध्यमिक शाळांसाठी राज्य/ जिल्हा /महानगरपालिका/ नगरपालिका/ तालुका/पंचायत स्तरावर योगासन (योग-मुद्रा) स्पर्धांचे आयोजन करणे.

(ग) योग किंवा प्राकृतीक चिकीत्सा यांच्या फायद्याबाबत सर्वसामान्यांना शिक्षीत करणे, अभियान चालविणे आणि जनजागृती करणे तसेच शालेय अभ्यासक्रमात योग हा विषय समाविष्ट करण्याबाबत पाऊले उचलणे.

(घ) योग अभ्यासक्रम, पाठ्य विवरण, शैक्षणिक मानके यांची वेळोवेळी समिक्षा करणे तसेच त्याबाबत राज्य सरकारला शिफारशी करणे.

(ङ) अन्य विहित कार्ये.

**१८.** (१) रजिस्ट्रार, प्राकृतिक चिकीत्सा व्यवसायी यांची नोंदणी विशिष्ट शुल्क कार्य आकारून करेल. रजिस्ट्रार ची कार्ये.

(२) रजिस्ट्रार -

(क) राज्यात योग तथा प्राकृतीक चिकीत्सा व्यवसायिकांचे रजिस्टरची देखभाल करेल.

(ख) नितीसंहीता जी विहित करण्यात आली आहे त्या माध्यमातून नोंदणीकृत योग तथा प्राकृतिक चिकीत्सा व्यावसायिकांना व्यवसायाचे आचरण विनियमित करणे.

(ग) योग तथा प्राकृतीक चिकीत्सा व्यवसायिकांना सुनावणीची संधी प्रदान केल्यानंतर त्यात निलंबित करणे किंवा रजिस्टरमधून त्यांचे नांव काढणे किंवा त्यांच्या विरूध्द अनुशासनात्मक कारवाई करणे जी निर्धारित केली असेल.

**१९.** (१) कोणत्याही व्यक्तीची नोंदणी किंवा रजिस्टरमध्ये प्रविष्टी संदर्भात रजिस्ट्रारच्या निर्णयाने व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती आयोगाकडे याचिका सादर करू शकते. रजिस्ट्रारच्या निर्णयाविरुद्ध आयोगाकडे याचिका दाखल करणे आणि आयोगाच्या अन्य कार्याबाबत.

(२) अशी याचिका आयोगाकडे विहित पध्दतीने सादर करण्यात येईल आणि आयोगाद्वारे याचिका दाखल ती ऐकून निर्णय घेतला जाईल.

बजेटची मागणी.

**२०.** (१) आयोग, अंदाजित खर्च तसेच आर्थिक उपलब्धी आदींच्या माध्यमातून आगामी वित्तीय वर्षासाठी जी तारीख निर्धारित करण्यात आली आहे त्या कालावधीत बजेटची मागणी तयार करेल आणि विहीर प्रारूपामध्ये राज्य सरकारला सादर करेल.

(२) राज्य सरकार काही सुधारणा असल्यास ती तपासून प्रस्तुत करण्यात आलेल्या अनुदानाला स्विकृत करेल.

(३) जेव्हा राज्य सरकारद्वारे अनुदान स्विकृत केले जाते तेव्हा आयोग त्या प्रयोजनासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे अशा अनुदानातून निधीचा उपयोग करण्यासाठी सक्षम राहील.

लेखा परिक्षण.

**२१.** (१) आयोग, असे प्रारूप तथा पद्धत विहीत करेल ज्यात उचित लेखाविषयक तसेच अन्य सुसंगत अभिलेखांचा समावेश करेल आणि उत्पत्र व व्यय तसेच तुलन-पत्र, उपयोग प्रमाणपत्र यांच्यासहीत लेख्यांचे वार्षिक विवरण तयार करेल.

(२) आयोग लेख्यांची तपासणी तसेच लेखा परिक्षण स्थानिक निधी लेखा यंत्रणांच्या माध्यमातून योग्य पद्धतीने करेल.

(३) आयोगाचे लेखा परिक्षण तसेच कार्यअहवाल आयुष विभागाला प्रत्येक वर्षी ३१ जुलैच्या पूर्वी पाठविण्यात येईल.

आयोगाचा निधी.

**२२.** (१) आयोगाचा निधी, नोंदणीकरण, नुतनीकरण, शुल्क आदीच्या रूपात एकत्रीत करण्यात आलेल्या निधीच्या माध्यमातून तयार होईल आणि हा निधी राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडून त्यात जमा करण्यात येईल.

(२) आयोगाचा अध्यक्ष आणि रजिस्ट्रार या अधिनियमातील तरतूदींना कार्यान्वी करण्यासाठी संबंधित बँक खाते संयुक्त रूपात संचालित करेल.

नियम तयार करणारी शक्ती.

**२३.** (१) शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) या अधिनियमाअंतर्गत तयार करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो तयार करण्यात आल्यानंतर त्वरीत राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर सादर करण्यात येईल.

अधिकारी तसेच कर्मचारी यांचे लोकसेवक होणे.

**२४.** या अधिनियमाअंतर्गत नियुक्त प्रत्येक अधिकारी तथा कर्मचारी या तसेच कर्मचारी अधिनियमातील कोणत्याही तरतूदीचा प्रयोग करताना किंवा कर्तव्याचे पालन यांचे करताना भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम २१ अंतर्गत अर्थानुसार लोकसेवक मानले जातील.

अडचणी दूर करणे.

**२५.** (१) जर या अधिनियमातील तरतूदींची प्रभावी रूपाने अंमलबजावणी होण्यामध्ये अडचणी निर्माण होत असतील तर राज्य सरकार **राजपत्रात** प्रकाशित आदेशाद्वारे या अधिनियमातील तरतूदींशी सुसंगत नियम करू शकेल, जे त्या अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक समजले जातील :

परंतु असा कोणताही आदेश या अधिनियमाच्या प्रारंभीच्या तिथीपासून दोन वर्षाच्या कालावधी समाप्त झाल्यानंतर करण्यात येणार नाही.

(२) या अधिनियमाअंतर्गत तयार करण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो तयार केल्यानंतर त्वरीत राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहासमोर सादर करण्यात येईल.

सद्‌भावपूर्वक करण्यात कार्यवाहीचे संरक्षण.

**२६.** कोणताही वाद किंवा विधीविषयक कार्यवाही या अधिनियमांतर्गत तयार करण्यात नियमांच्या अधीन राहून सद्‌भावपूर्वक करण्यात आली आहे. कोणत्याही गोष्टी-साठी करण्यात आलेल्या सदर कार्यवाही कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांच्या विरुद्ध राहणार नाही.

## उद्देश आणि कारणे यांचे निवेदन

मानवी स्वाथ्याच्या समस्या दिवसेंदिवस वाढत चालल्या आहेत. अशा स्थितीत समाजाला स्वस्थ आणि समृद्ध बनविण्यासाठी योगसाधनेशिवाय पर्याय नाही, जागतीक स्तरावरदेखील उत्तम शारिरीक वास्थ्यासाठी पर्याय म्हणून योगाला मान्यता मिळाली आहे. योगसाधनेबाबत जनजागृती करून समाजाला स्वस्थ व सुदृढ ठेवण्यासाठी योगशिक्षक स्वयंप्रेरणेने व निःस्वार्थवृत्तीने निरंतर कार्य करीत आहेत. महाराष्ट्रात योग आयोग स्थापन करावा अशी मागणी गेल्या काही वर्षांत योगशिक्षक संघाद्वारे करण्यात येत आहे. गुजरात, हरियाणा, राजस्थान या राज्याप्रमाणे महाराष्ट्रात योग आयोग स्थापन करण्याची आवश्यकता आहे.

महाराष्ट्रात योगाच्या क्षेत्रात बराच विस्तार झाला आहे. सद्यःस्थितीत राज्यात कोणताही योग आयोग उपलब्ध नाही. महाराष्ट्रात योग या विषयासंदर्भात प्रचार, व्यवस्थापन, प्रशिक्षण आणि विनियमन, योग आणि प्राकृतीक चिकीत्सा व्यावसायिकांची नोंदणी करण्याच्या उद्देशासाठी महाराष्ट्रात योग आयोगाची स्थापना करणे आवश्यक आहे. यासाठी योग तसेच प्राचीन थेरेपीज यांचे महत्व, प्रभाव आणि उपयोगीता यांचे महत्व लक्षात घेता योगाचा प्रचार, व्यवस्थापन, विनियमन, प्रशिक्षण यासाठी तसेच प्राकृतीक चिकीत्सा पद्धतीचा विकास करण्यासाठी आणि क्रिडा प्रकारांच्या माध्यमातून प्रशिक्षण, प्रोत्साहन तसेच योगासन आदीसाठी योग आयोगाची अत्यंत आवश्यकता आहे. महाराष्ट्रात योग आयोगाची स्थापना झाल्यास सर्वसामान्य जनतेसाठी ते विशेष लाभदायक ठरेल.

वरील उद्दिष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा हेतु आहे.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक ०६ मार्च, २०२६.

**सुधीर मुनगंटीवार,**
(प्रभारी सदस्य).

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहे :-

**खंड २३.–** या खंडान्वये या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याचे अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा वरील प्रस्ताव हा सामान्य स्वरूपाचा आहे.

## वित्तीय ज्ञापन

महाराष्ट्र राज्यात योग आयोग स्थापन करणे व ती कार्यान्वीत करणे तसेच अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करणे त्याचबरोबर समिती, अशासकीय सदस्यांना बैठकीस उपस्थित राहण्यासाठी मानधन व भत्ता देणे तसेच अधिकारी आणि कर्मचारी यांना प्रदेय असलेले वेतन याकरिता राज्याच्या एकत्रीत निधीतून आवर्ती खर्च होण्याची शक्यता आहे. सद्यःस्थितीत या अधिनियमाच्या अधिनियमित्तेवरील खर्च नमूद करणे शक्य नाही.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक १३ मार्च, २०२६.

**जितेंद्र भोळे,**
सचिव -१,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.